**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका असं केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन

- अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्यासाठी राज्यशासन वचनबद्ध असल्याचं महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- हनुमान जयंती निमित्त देशभरात भक्तिपूर्ण कार्यक्रम

- अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या सर्व परदेशी नागरिकांनी अमेरिकन सरकारकडे नोंदणी करणं अनिवार्य

**आणि**

- नेमबाजी विश्वकरंडक स्पर्धेत भारत चार सुवर्णपदकं, २ रौप्य आणि २ कांस्यपदकांसह दुसऱ्या स्थानावर

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे त्यांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. महाराष्ट्रात किल्ले रायगड इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**... होल्ड - बाईट- अमित शहा**

अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक विकसित करण्यासाठी राज्यशासन कसोशीने प्रयत्न करेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं अशी मागणी त्यांनी केली. भाजपाचे खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयन राजे

भोसले यांचंही यावेळी भाषण झालं. छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटन स्थळांचं सर्किट विकसित करावं अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं जाऊन राजमाता जिजाऊ भोसले यांच्या समाधीला वंदन केलं.

**<><><><>**

हनुमान जयंती आज देशाच्या विविध भागात उत्साहात साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हनुमान जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील राज्याच्या नागरिकांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

भगवान हनुमानाच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच हनुमान मंदिरांमध्ये भाविक गर्दी करत आहेत. यानिमित्त मंदिरांमध्ये हनुमान चालीसा, सुंदर कांड आणि अखंड रामायणाचं पठण केलं जात आहे. नवी दिल्लीत कॅनॉट प्लेस इथल्या प्राचीन हनुमान मंदिरात लोकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. उत्तर प्रदेशात हनुमान मंदिरांमध्ये भाविक मोठ्या संख्येनं जमले आहेत. अयोध्येच्या काळेराम मंदिरात आज हनुमान जयंती साजरी करण्यात आली. या मंदिरात दक्षिणेकडे तोंड करून हनुमानाची मूर्ती स्थापित केली आहे. ही मूर्ती देवीच्या रूपात असून तिच्या हातात गदे ऐवजी खंजीर आहे. महाराष्ट्रातल्या हनुमान मंदिरांमध्ये देखील सकाळपासून गर्दी आहे.

**<><><><>**

छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यात आज सुरक्षादलांबरोबरच्या चकमकीत २ माओवादी ठार झाले. या जिल्ह्यात इंद्रावती जंगल परिसरात नक्षलविरोधी मोहीम राबवण्यात येत होती. त्यादरम्यान ही चकमक झाली. सुरक्षादलांनी दोन्ही माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. शोधमोहीम अद्याप सुरु आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मीरच्या अखनूर विभागात दहशतवाद्यांच्या समूहाचा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरुन घुसखोरीचा प्रयत्न आज भारतीय लष्करानं हाणून पाडला. अखनूरमधे केरी भट्टल परिसरात काल रात्री काही सशस्त्र दहशतवाद्यांची हालचाल लष्करानं टिपली, आणि त्यांना शरण यायला सांगितलं. त्यानंतर झालेल्या चकमकीत लष्कराचा कनिष्ठ कमिशन्ड अधिकारी शहीद झाला. या प्रकारानंतर संबंधित क्षेत्रात बंदोबस्त वाढवण्यात आला असून शोध मोहीम तीव्र करण्यात आली आहे.

<><><><>

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं सुखोई-30 एमकेआय विमानातून लांब पल्ल्याच्या ग्लाइड बॉम्ब गौरवची यशस्वी चाचणी काल घेतली. या चाचणीत सुमारे १०० किलोमीटरचा पल्ला अचूकपणे पार केल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. गौरव हा एक हजार किलो ग्रॅम वजनाचा ग्लाइड बॉम्ब असून चंडीपूर इथल्या संशोधन केंद्रात तो विकसित केला आहे.

<><><><>

अल्पसंख्यक व्यवहार मंत्रालयाचे सचिव डॉक्टर चंद्रशेखर कुमार यांनी आज सौदी अरेबियात जाऊन हज यात्रेच्या तयारीची पाहणी केली. हज यात्रेसाठी राहण्याची उत्तम सोय आणि स्वच्छतेबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. हज यात्रेसाठी भाविकांनी सुविधा पुरवण्यात सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही असं अल्पसंख्यक व्यवहार मंत्रालयानं समाजमाध्यमाद्वारे म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या सर्व परदेशी नागरिकांनी अमेरिकन सरकारकडे नोंदणी करणं अनिवार्य असल्याचं अमेरिकी सरकारनं स्पष्ट केलं आहे. याचे पालन न केल्यास त्यांना कठोर दंड, तुरुंगवास,

तसंच हद्दपारीला सामोरं जावं लागेल असा इशारा दिला आहे. नवीन नियमानुसार सर्व व्हिसा धारक आणि वैध कायम निवासी परदेशी नागरिकांना नोंदणीचे पुरावे स्वतःसोबत कायम बाळगावे लागतील. अमेरिकेत ३० दिवसांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या तसंच देशात नव्यानं प्रवेश केला असल्यास एका महिन्याच्या आत या सर्वांना नवीन नियमानुसार कार्यवाही करावी लागेल. वयाची १४ वर्ष पूर्ण झालेल्या मुलांनाही पुनर्नोंदणी करणं आवश्यक राहणार आहे.

**<><><><>**

ऑस्ट्रियामधल्या भारतीय समुदायाच्या सहकार्यानं ऑस्ट्रियाशी असलेले निकट संबंध वृद्धिंगत करण्यासाठी भारत सरकार सातत्यपूर्ण प्रयत्न करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या काल ऑस्ट्रियात व्हिएन्ना इथं भारतीय समुदायाशी संवाद साधताना बोलत होत्या. ऑस्ट्रियाच्या विकासात भारतीय उद्योजकांच्या महत्वपूर्ण योगदानाबाबत त्यांनी प्रशंसा केली आहे. भारत आणि ऑस्ट्रियामध्ये स्टार्ट अप्स, अर्थ तंत्रज्ञान, हरित तंत्रज्ञान आणि पर्यावरणपूरक भागीदारी वाढवण्यासाठी दोन्ही देशांच्या उद्योजकांमध्ये उचित क्षमता असल्याचं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

युरोपमधल्या प्राण्यांमध्ये फूट अँड माऊथ आजार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर युनायटेड किंग्डमनं आजपासून युरोपमधल्या देशांमधून मांस आणि दुग्धजन्य पदार्थांच्या आयातीवर बंदी घातली आहे. युकेमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रवाशांना आपल्यासोबच वैयक्तिक वापरासाठी मेंढी, बकरी, गाय, डुकराचे मांस आणि दुग्धजन्य पदार्थ आणता येणार नाहीत. याशिवाय सँडविच, चीझ, कच्चं मांस, आणि दूध आणण्यावर ही बंदी असणार आहे. फूट अँड माऊथ आजार हा प्राण्यांमध्ये होणारा विषाणूजन्य आजार आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची सेंट पीटर्सबर्ग इथं भेट घेतली. यावेळी युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्याबाबत त्यांच्यात चर्चा झाली. रशियाचे विशेष दूत किरील दिमित्रीव्ह यांनी ही चर्चा फलदायी झाल्याचं म्हटलं आहे. दरम्यान रशिया आणि युक्रेनमध्ये शांतता चर्चेला होत असलेल्या विलंबाबद्दल, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल निराशा व्यक्त केली. ट्रम्प यांनी रशियाला युक्रेनसोबत युद्धबंदीच्या चर्चेला गती देण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

अर्जेंटिना इथं सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा फेडरेशन आयोजित विश्वकरंडक स्पर्धेत भारतानं चार सुवर्णपदकं, २ रौप्य आणि २ कास्यपदकांसह आठ पदकं जिंकून चीननंतर दुसरं स्थान मिळवलं आहे. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी, सौरभ चौधरी आणि सुरुची सिंग या भारतीय जोडीने कांस्यपदक जिंकले, तर सिफ्ट कौर समरा, रुद्रांक्ष पाटील, सुरुची सिंग, विजयवीर सिद्धू, ईशा सिंग, चैन सिंग आणि आर्या बोरसे या खेळाडूंनीही चमकदार कामगिरी करत पदकांना गवसणी घातली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना दुपारी लखनौ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स या दोन संघांमध्ये होणार असून संध्याकाळी सनराइजर्स हैदराबाद आणि किंग्स इलेव्हन पंजाबमध्ये दुसरा सामना रंगणार आहे. गुजरात टायटन्सचा संघ  आतापर्यंत झालेल्या पाचपैकी चार सामन्यांत विजय मिळवत गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे.

दरम्यान, काल संध्याकाळी चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाईट राईडर्स यांच्यात झालेल्या सामन्यात कोलकात्यानं चेन्नईला सहज नमवत विजय मिळवला.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागांनं जम्मू-काश्मीर, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणमध्ये मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. याठिकाणी पुढील चार दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

तामिळनाडूत अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षानं राष्ट्रीय लोकशाही आघाडीसोबत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी युतीचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाविषयी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**//<><><><><>//**